महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना सुधारीत दराने गणवेश भत्ता मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः गणभ ०२१८ /प्र.क्र.१/भापोसे कक्ष
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा -

१) भापोसे अधिका-यांना (गणवेश) नियम १९५४ मध्ये सुधारणा करुन प्रसिध्द करण्यात आलेले केंद्र शासनाचे दि. २५.०८.२००९ चे राजपत्र.

२) भारत सरकार, वित्त मंत्रालय, यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १९०५१/१/२०१७-ई-IV दिनांक ०२/०८/२०१७.

३) भारत सरकार,गृह मंत्रालय,यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.एमएचअे युओ क्र. ४५०१११/०१/२०११-आयपीएस II दिनांक ०९/११/२०१७.

प्रस्तावना -

१) केंद्र शासनाच्या कार्मिक लोकतक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, (कार्मिक व प्रशिक्षण विभाग) यांचेव्दारा उपरोक्त नमुद अधिसूचनेव्दारे भारतीय पोलीस सेवा (गणवेश) नियम १९५४ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर सुधारणांनुसार भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना यापूर्वी देण्यात येणा-या गणवेशासंबंधीचे भत्ते (उदा. clothing allowance, Initial equipment allowance, Kit Maintenance allowance, Robe allowance, Robe Maintenance Allowance, Shoe Allowance, Uniform Allowance and Washing Allowance) देण्यासंदर्भातील यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले कार्यालर्यालयीन ज्ञापन रदद् करण्यात आले असून वरील सर्व नमूद भत्ते गणवेश भत्यात एकत्रित करण्यात आले आहेत. त्यामुळे गणवेश भत्याचा दर रु. १४,०००/- ऐवजी सरसकट रु. २०,०००/- प्रतिवर्षी असा सुधारीत करण्यात आला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना वरील सुधारणा लागू करण्याची बाब शासनाच्या विचारीधीन होती.

शासन निर्णय-

शासन आता याव्दारे, केंद्र शासनाच्या वाचा क्र. २ व ३ येथील नमुद कार्यालयीन ज्ञापनाव्दारे प्रस्तृत केलेल्या सुधारणा महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना दिनांक ०१.०७.२०१७ पासून लागू करण्यास मान्यता देत आहे.

२. महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना यापूर्वी देण्यात येत असलेले विविध गणवेशासंबंधीचे भत्ते (उदा. clothing allowance, Initial equipment allowance वगैरे) एकत्रित करुन आता ते गणवेश भत्यात अंतर्भूत केले असून त्यांना सरसकट रु. २०,०००/- प्रतिवर्षी इतका गणवेश भत्ता देण्यात यावा.

३. सदरहू गणवेश भत्ता प्रत्येक वर्षाच्या जुलै महिन्यात संबंधित अधिका-यांना त्यांना देय असलेल्या वेतनात एकदाच जमा करण्यात यावा.

४. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांना अनूज्ञेय महागाई भत्याच्या दरात दरवेळी ५०% ने वाढ झाल्यावर गणवेश भत्ता दरात २५% ने वाढ करण्यात येईल.

५. सदरचे दर हे दि. ०१ जुलै २०१७ पासून लागू होतील.

६. याबाबतचा खर्च महासंचालक व पोलीस महानिरीक्षक कार्यालयाच्या वेतन व भत्ते या साठीच्या तरतुदीतून भागविण्यात यावा. गणवेश भत्याबाबतचा खर्च महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी ज्या विभागात/कार्यालयात कार्यरत आहेत त्या विभागाच्या / कार्यालयाच्या वेतन व भत्ते यासाठीच्या तरतुदीतुन अदा करण्यात यावा आणि तो विभागाच्या/कार्यालयाच्या अर्थसंकल्पीय वर्षातील " २०५५ पोलीस-००१-संचालन (००)(०१) प्रशासन व पोलीस निरीक्षणालय वेतन "शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. यासाठी लागणारी अतिरिक्त तरतुद अर्थसंकल्पित करण्यात यावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग दि. १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग- पहिला, उपविभाग-३ मधील अनुक्रमांक ४, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२२१३२३५५२४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tushar Vasant Mahajan

Digitally signed by Tushar Vasant Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=Tushar Vasant Mahajan
Date: 2018.02.22 13:28:34 +05'30'

(तुषार महाजन)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. गृहमंत्री यांचे सचिव
४. महालेखापाल (ले.व.ह.) महाराष्ट्र -१, मुंबई
५. महालेखापाल (ले.व.ह.) महाराष्ट्र -२,नागपूर
६. महालेखापाल (ले.व.प.) महाराष्ट्र -१, मुंबई
७. महालेखापाल (ले.व.प.) महाराष्ट्र -२, नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०.महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, म.रा. मुंबई
११.भापोसे अधिकारी कार्यरत असलेले सर्व कार्यालय प्रमुख
(महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, म.रा. यांचेमार्फत)

१२.राज्य संवर्गातील सर्व भापोसे अधिकारी
(महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, म.रा. यांचेमार्फत)
१३. महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील संबंधित सांविधिक व सार्वजनिक उपक्रम
(महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, म.रा. यांचेमार्फत)
१४. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण, कार्मिक लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय कार्मिक व प्रशिक्षण विभाग नवी दिल्ली
१५. गृह विभाग / कार्यासन पोल -१, पोल-१अ, पोल-५अ, पोल-५ब
१६.निवडनस्ती